कृपया प्रसिद्धीसाठी

**प्रेस नोट**

**उबेर गाडी चालकाचा प्रामाणिकपणा व चतुःश्रृंगी पोलिसांची कर्तव्यदक्षता**

**एक लाखाचा चेक व चीजवस्तू सुरक्षित परत**

औंध येथे राहाणारे उबेर गाडी चालक श्री. दिनेश रमेश ठोसर यांनी २१ मे रोजी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात येऊन, गाडीत विसरलेली एक लेडीज हँडबॅग पोलीसांना सुपूर्द केली. पर्सच्या मालकिणीची ओळख पटवेल असं फारसं काही पर्समध्ये नव्हतं, पण पर्समधील सामान मात्र महत्त्वाचं होतं. इथे हँडबॅगच्या मालकिणीपर्यंत पोचण्यात पोलिसांची कसोटी होती.

बायकांच्या पर्समध्ये नेहमी असणाऱ्या पावत्या आणि क्रेडिट कार्डच्या सुतावरून पोलिसांनी बरेच धागे जुळवले आणि त्या महिलेला पोलीस ठाण्यात बोलावून घेतले. दरम्यान पर्स गेल्यामुळे ती हवालदिल झाली होती, पोलिसांच्या दूरध्वनीमुळे तिला साश्चर्य आनंद झाला. पोलिस ठाण्यात पोलिसांनी पर्स त्याच महिलेची असल्याची खात्री करून मुद्देमालासह पर्स मालकीणबाईंना परत केली. पर्समध्ये होता एक लाख रुपयांचा धनादेश, परकीय चलन, क्रेडिट कार्ड व रोख रक्कम.

उबर चालक श्री. ठोसर यांनी तत्परतेने गाडीत राहिलेली वस्तू पोलीस ठाण्यात आणून दिली हे खरोखर विशेष. ती वस्तू पुढच्या प्रवाशाबरोबर बाहेर जाऊ शकली असती, चालकालाच मोह पडू शकला असता, दुसऱ्याच कुणीतरी ती वस्तू आपली आहे असे म्हणून नेली असती... या सर्व शक्यता श्री. ठोसर यांच्या एका कृतीने टळल्या. नेमक्या प्रवाशापर्यंत पोचण्याचा अंधुक दुवा असतानादेखील पोलिसांनी हुशारीने व्यक्तीचा शोध घेतला व रुजवात करून वस्तू मालकाच्या ताब्यात दिली. सहायक पोलीस आयुक्त श्री. देवीदास पाटील, खडकी विभाग, पुणे शहर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर जाधव, चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे यांच्या उपस्थितीत वस्तू मालकिणीला परत देण्यात आली. तिनेही पोलिसांचे व चालक श्री. ठोसर यांचे मनःपूर्वक आभार मानले.